पुढारी

# 'एनएसएस'तर्फे स्वच्छता मोहीम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे विद्यापीठ परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. ५०० पेक्षा अधिक बॉटल्ससह प्लास्टिक संकलित करण्यात आले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. नंदकुमार मोरे, डी. डी. शिंदे यांनी मोहिमेत सहभाग घेतला. एनएसएसचे संचालक प्रा. अभय जायभाये, प्रा. अमोल कुलकर्णी, प्रा. डॉ. कुरणे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

२ 5 FEB 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी शिक्षक संघाचे आज अधिवेशन

## व्ही. एम. पाटील यांची माहिती : राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** न्यू कॉलेज आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघातर्फे आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र आणि विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे अकरावे वार्षिक अधिवेशन आज, शुक्रवारी (दि. २५) आणि शनिवारी (दि. २६) होणार आहे. या चर्चासत्रात '१९९० नंतरची मराठी कादंबरी' या विषयावर विचारमंथन होणार असल्याची माहिती न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी मंगळवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

न्यू कॉलेजच्या परिसरात शुक्रवारी सकाळी १० वाजता श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे अध्यक्ष के. जी. पाटील आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते चर्चासत्र आणि अधिवेशनाचे उद्घाटन होईल.

अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. अनिल गवळी असतील. चर्चासत्रात नितीन रिंढे, रंगनाथ पठारे, प्रवीण बांदेकर, सोनाली नवांगुळ, किरण गुरव, रघुनाथ कैंगार, दत्ता पाटील, रणधीर शिंदे, आदी साहित्यिक, लेखक आणि विचारवंत सहभागी होतील. संघातर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धांचे पारितोषिक वितरण, गुणवंत विद्यार्थी सत्कार, ललित, ललितेतर, संपादन साहित्य प्रकारातील ग्रंथ पुरस्कार, गुणवंत शिक्षक पुरस्कार, सेवानिवृत्त प्राध्यापक सत्काराचा कार्यक्रम होणार आहे.

अधिवेशन, चर्चासत्राचा समारोप शनिवारी दुपारी ३.३० वाजता होणार असल्याची माहिती डॉ. पाटील यांनी दिली. यावेळी मराठी शिक्षक संघाचे अध्यक्ष प्रकाश दुकळे, उपाध्यक्ष प्रवीण चंदनशिवे, सर्जेराव पद्माकर, गुंडोपंत पाटील, प्रा. अविनाश पाटील, उपप्राचार्य टी. के. सरगर, प्रा. आर. डी. ढमकले उपस्थित होते.

पुढारी

# ५५ हजार विद्यार्थ्यांनी दिली ऑनलाईन परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर २०२१ हिवाळी सत्राच्या विद्यापीठ स्तरावरील परीक्षेंतर्गत गुरुवारी २०८ विषयांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या. ५७ हजार ८६७ पैकी सुमारे ५५ हजार ६६२ विद्यार्थी परीक्षेला बसले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची दि. २६ रोजी परीक्षा आहे. त्यामुळे यादिवशीच्या सर्व विद्यापीठाच्या सर्व परीक्षा रविवार (दि. २७) रोजी नियोजित वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात येणार आहेत, असे परिपत्रक विद्यापीठाने काढले आहे.

सकाळ



कोल्हापूर : प्राचार्य डॉ. प्रकाश कुंभार यांनी संपादित केलेल्या 'कोरोनानंतरचे जग : साद-पडसाद' व 'पाचलेणी' पुस्तक प्रकाशनप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अपर्णा वाईकर, मारुतराव कातवरे, डॉ. नमिता खोत, ज्योती कुंभार.

# कोरोनानंतरचे जग : साद-पडसाद 'पाचलेणी' पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर, ता. २४ :** प्राचार्य डॉ. प्रकाश कुंभार संपादित पुस्तके नैसर्गिक आपत्तीच्या काळात धीर देणारी आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांनी आज येथे केले.

प्राचार्य डॉ. प्रकाश कुंभार यांनी संपादित केलेल्या 'कोरोनानंतरचे जग : साद-पडसाद' व 'पाचलेणी' पुस्तक प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवन येथे कार्यक्रम झाला.

श्री. कांबळे म्हणाले, "कोरोना काळात माणूस आतून व बाहेरून दुभंगला गेला. त्याचं जगणं टांगणीला लागलं. माणूस जगण्यापेक्षा मृत्यूचा जास्त विचार करायला लागला. माणसाची झोप उडाली. आरोग्य, शिक्षण, शेती, औषध कंपन्या अशा सर्व घटकांवर परिणाम झाले.

प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, " मोठी माणसे आवर्जून वाचतात. एखादे राष्ट्र उध्वस्त करायचे असेल तर तिथली वाचन संस्कृती संपवावी, असे म्हटले जाते. संस्कृती वाचनापासून सुरू होते. त्यामुळे दोन्ही पुस्तके वाचन संस्कृतीसाठी महत्वाची आहेत." जिल्हा ग्रंथालय अधिकारी अपर्णा वाईकर, माजी महापौर मारुतराव कातवरे व, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी ज्योती कुंभार, डॉ. सुजय पाटील, डॉ. नितीश सावंत, डॉ. सर्जेराव जाधव, बाजीराव मानगावे उपस्थित होते.

सकाळ

# वनस्पतीबाबत संवेदनशील राहणे गरजेचे

## प्रा. व्ही. ए. बापट; विज्ञान जागृती सप्ताहात संवाद

**कोल्हापूर, ता. २४ :** माणसांप्रमाणे वनस्पतींनाही संवेदना असतात. वनस्पतीशास्त्राचा मानवाने शाश्वत विकास केल्यास जगाला भेडसावणारे अनेक प्रश्न मिटतील. यासाठी वनस्पतीबाबत संवेदनशील राहणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जैवतंत्रज्ञान आणि राष्ट्रीय विज्ञान अकादमीचे मानद शास्त्रज्ञ प्रा. व्ही. ए. बापट यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील एसएआयएफ- सीएफसी विभागातर्फे आयोजित विज्ञान जागृती सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी भौतिकशास्त्र विभागात विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. त्या वेळी ते बोलत होते.

प्रा. बापट म्हणाले, ''प्राण्यांपेक्षा वनस्पती, बदलत्या वातावरणात तग धरू शकतात. काही प्रयोगांतून संगीतामुळे झाडांची वाढ चांगली होत असल्याचे समजले आहे. संपूर्ण जीवसृष्टी वनस्पतींवर अवलंबून आहे. आयुर्वेदाचा पाया ही वनस्पतीच असल्याने, आपल्या संस्कृतीत महिलांची नावे देखील विविध विविध वनस्पतींवरून घेतलेली आढळतात.



**कोल्हापूर : विज्ञान जागृती सप्ताहात प्रा. व्ही. ए. बापट यांचा सत्कार करताना डॉ. के. वाय. राजपुरे.**

डॉ. आर. व्ही. सोनकवडे यांच्या अथक प्रयत्नातून राज्यातील पहिले अकृषी विद्यापीठ म्हणून शिवाजी विद्यापीठाला विज्ञान जागृती सप्ताह आयोजित करण्याची संधी मिळाली, याचे श्रेय त्यांना जाते.''

या वेळी प्रा. बापट यांचा डॉ. के. वाय. राजपुरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. तुकाराम डोंगळे यांनी उपक्रमासाठी परिश्रम घेतले. प्रा. के. डी. पवार यांनी आभार मानले.

# गुळापासून बनणार साठहून अधिक पदार्थ

## उद्योजकता, कौशल्य विकास केंद्राचे संचालक डॉ. गुरव यांची माहिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या उद्योजकता आणि कौशल्य विकास केंद्रामार्फत गुळापासून एक-दोन नव्हे, तर तब्बल साठपेक्षा अधिक प्रकारचे पदार्थ बनवण्याचे प्रशिक्षण आणि मार्गदर्शन गूळ उद्योजकांना दिले जाते आहे. गूळ कँडी, गूळ पावडर, काकवी, गुळाचा चहा, गुळाची चॉकलेट अशा पदार्थांचा यात समावेश आहे.

शिवाजी विद्यापीठातील उद्योजकता आणि कौशल्य विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव सातत्याने गुळवे आणि शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत असतात. वीस वर्षांहून अधिक काळ गुळावर संशोधन करीत आहेत. त्यांनी शिवाजी विद्यापीठासह अन्यत्रही २५ गुळवे प्रशिक्षण शिबिरे घेतली आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या सहा गूळ प्रकल्प कार्यरत आहेत. यामध्ये सांगली, मजले, रहिमतपूर, पंचतारांकित एम.आय.डी.सी., नेज आणि कणेरी मठ येथील गूळ-उत्पादन प्रकल्पांचा समावेश आहे. डॉ. गुरव म्हणाले, सध्याच्या आधुनिक युगात युवकांचा ओढा उद्योजकतेच्या दिशेने वाढतो आहे. त्यामध्ये नवनवीन उद्योगांचा समावेश आहे. त्यामध्येच शरीरासाठी अत्यंत लाभदायक गुळापासून विविध पदार्थ बनवण्याचा व्यवसाय वाढत आहे. या व्यवसायातून रोजगार निर्मितीही होत आहे. शिवाजी विद्यापीठाचे उद्योजकता आणि कौशल्य विकास केंद्र गेली अनेक वर्षे गूळ उद्योगासाठी मार्गदर्शकाची भूमिका पार पाडत आहे. सध्या कोल्हापूरजवळील ५ ते १० गुऱ्हाळघरांवर कार्यशाळा घेण्याचा मानस असल्याचेही त्यांनी सांगितले.



**कोल्हापूर : गुळापासून कोणकोणते पदार्थ बनू शकतात हे दाखवताना डॉ. ए. एम. गुरव.**

### भेसळ गुळापासून दूर राहा

खरेदी विक्रीतील पारदर्शकता हेच कोणत्याही व्यवसायाच्या यशाचे गमक असते. गुळात साखरेची भेसळ करून गोडवा वाढवण्याचे प्रकार काही ठिकाणी घडतात. अशा भेसळीच्या प्रकारांपासून शेतकऱ्यांनी जाणीवपूर्वक दूर राहायला हवे. उत्पादनातील गुणवत्ता सांभाळली की आपोआप त्याची उत्तम विक्री होऊ शकते.

### तरुणांनी व्यवसाय करावा

गुळापासून पदार्थ बनवण्याचा व्यवसाय खर्चिक असला तरी तरुणांनी हा व्यवसाय सुरू करावा. काहींनी व्यवसायात कमी कालावधीत उत्तम यश संपादन केले आहे. योग्य नियोजन आणि मार्गदर्शनाखाली हा व्यवसाय यशस्वी होतो.

### गुळापासून बनतात हे पदार्थ

गुळाची ढेप, गूळ पावडर, क्यूब (घन), काकवी, मोदक, गुळाचे ग्रॅन्युल्स, गुळाचे कॅडबरीसदृश चॉकलेट्स, गुळाचे सरबत, गुळाची बिस्किटे, नाचणी-गुळाची बिस्किटे, गूळ चहा प्रि-मिक्स, गूळ कॉफी प्रि-मिक्स, गूळ लिंबूपाणी, चिक्की- शेंगदाणे, चणा डाळ, गूळ सुजी, डार्क चॉकलेट, गूळ कँडी, चिरमुरा लाडू, राजगिरा लाडू, बुंदीचे लाडू, नाचणीचे लाडू, गुळाची रेवडी, मऊ खारकेतील बी काढून त्यामध्ये उत्तम प्रतीचा गुळ भरून तुपाचे दोन थेंब घालून ते बंद केले जाते. ते आठ दिवस ठेवल्यानंतर अत्यंत चविष्ट पदार्थ तयार होतो.